**महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकिय देखभाल) नियम-१९६१**

"ड" प्रपत्रातील खाजगी रुग्णालयाचा नोंदणी क्रमांक नमूद करण्याची अट शिथिल करण्याबाबत.

उस्मानाबाद जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग
विभाग
26 JUL 1999

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग,
शासन निर्णय,क्रमांक : एमएजी-१०९९/प्र.क्र.१२६/आरोग्य-३
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक- २८ जून,१९९९.

वाचा :- १) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक : एमएजी-१०८१/४९०७/ सीआर-१७अ, दिनांक १९ ऑक्टोबर,१९८३ व दिनांक २ जानेवारी,१९८५
२) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक : एमएजी-१०८४/४१५७/ सीआर-१५६/आरोग्य-९, दिनांक २९ एप्रिल,१९८५.

**प्रस्तावना:-** महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकिय देखभाल) नियम-१९६१ मधील तरतुदीनुसार ... न विनिर्दिष्ट २३ आकस्मिकता उद्भवणाऱ्या आजारावर खाजगी रुग्णालयांत केलेल्या उपचारानंतर अथवा ५ गंभीर आजारावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी रुग्णालयात विशिष्टोपचार करुन घेतल्यानंतर "क" व "ड" प्रपत्रातील माहिती देयक पारित करण्यासाठी अत्यावश्यक असते. परंतु कित्येकवेळा "ड" प्रपत्रातील रुग्णालयाचा नोंदणी क्रमांक नमूद केलेला नसल्यामुळे देयक पारित होण्यास अडचणी येत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे.

महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल रजिस्ट्रेशन ॲक्टनुसार खाजगी नर्सिंग होम अथवा रुग्णालये यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेकडे नोंदणी करणे अत्यावश्यक असून, ती त्यांची नैतिक जबाबदारी आहे. परंतु कारणपरत्वे नोंदणीकृत नसलेली असंख्य खाजगी रुग्णालये अस्तित्वात असून, सदरहू रुग्णालयात शासकिय कर्मचारी व त्यांचे कुटुंबिय आकस्मिकता प्रसंगी उपचार करुन घेत असतात. परिणामी केवळ खाजगी रुग्णालय नोंदणीकृत नसल्याने, त्यांची देयके पारित होण्यास अडचणी येत असल्यामुळे उपरोल्लेखित "ड" प्रपत्रातील खाजगी रुग्णालयाचा नोंदणी क्रमांक नमूद करण्याची अट शिथिल करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय:-** उपरोक्त बाबींच्या संदर्भात सांगोपांग विचार विनिमय करुन सदर शासन निर्णयान्वये "ड" प्रपत्रामधील खाजगी रुग्णालयाचा नोंदणी क्रमांक नमूद करण्याची अट "एक ...च्या" कालावधीसाठी शिथिल करण्यास शासन मान्यता देत आहे. तसेच हे आदेश, प्रलंबित प्रकरणानाही लागू राहतील. मात्र ज्या खाजगी नर्सिंग होम/रुग्णालयास नोंदणी क्रमांक प्राप्त झालेला असेल अशा खाजगी नर्सिंग होम/रुग्णालयाने नोंदणी क्रमांक नमूद करणे अत्यावश्यक राहील. परंतु अद्यापि नोंदणी क्रमांक कारणपरत्वे प्राप्त झालेला नसेल, अशा खाजगी नर्सिंग होम/रुग्णालयातील संबंधित प्राधिकृत वैद्यकिय अधिकाऱ्यांनी त्यांचा स्वत:चा नोंदणी क्रमांक नमूद करणे अत्यावश्यक राहील.

एच-473(3000-6-99)।



www.lekhamitra.blogspot.com

२. सर्व मंत्रालयीन प्रशासकिय विभागानी हा शासन निर्णय, त्यांच्या प्रशासकिय नियंत्रणाखालील सर्व कार्यासने व कार्यालये यांना कळविण्याची व्यवस्था करावी.

३. नगर विकास विभाग/ग्राम विकास व जलसंधारण विभाग/वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात येणा-या आरोग्य संस्था (खाजगी नर्सिंग होम/रुग्णालये) यांची नोंदणी करुन घेण्याची कार्यवाही दिनांक ३१ डिसेंबर,१९९९ पर्यंत पूर्ण करुन घेण्याबाबत, योग्य त्या सूचना संबंधितांना त्वरीत निर्गमित कराव्यात.

सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक- वैप्र १०५/सेवा-५, दिनांक ३ एप्रिल,१९९९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( सीमा ढमढेरे )
महाराष्ट्र शासनाचे उपसचिव.

प्रति
मुख्य सचिव,सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई
प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई
सचिव, (सर्व मंत्रालयीन विभाग) मंत्रालय,मुंबई
सचिव, राज्यपाल, महाराष्ट्र राज्य,मुंबई (दोन प्रती)
मुख्यमंत्र्यांचे सचिव,मुख्यमंत्री सचिवालय,मंत्रालय,मुंबई
मुख्यमंत्र्याचे खाजगी सचिव,मुख्यमंत्री सचिवालय,मंत्रालय,मुंबई
मंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
राज्यमंत्री (आरोग्य) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय,मुंबई
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक
मुख्य सचिवांचे स्वीय सहाय्यक, सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय, मुंबई
* सचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई (५ प्रती)
* सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,विधान भवन,मुंबई (१० प्रती)
* सेटलमेंट कमिशनर अॅन्ड डायरेक्टर ऑफ लॅंड रेकॉर्डस, पुणे (२ प्रती)
विभागीय आयुक्त (सर्व) (प्रत्येकी २ प्रती)
जिल्हाधिकारी (सर्व) (प्रत्येकी २ प्रती)
मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद (सर्व) (प्रत्येकी ५ प्रती)
महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा व परिक्षा),मुंबई (दोन प्रती)
महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा व परिक्षा),नागपूर (दोन प्रती)
सहसंचालक, अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई (१० प्रती)
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (१० प्रती)
चिफ ऑडीटर, लोकल फंडस अकाऊंटस, मुंबई (१० प्रती)
कोषागार अधिकारी (सर्व) (प्रत्येकी ५ प्रती)
संचालक, आरोग्य सेवा,मुंबई (५० प्रती)
संचालक, वैद्यकिय शिक्षण व संशोधन, मुंबई (५० प्रती)

एच-473(3000-6-99)।अ



www.lekhamitra.blogspot.com